# International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

IJARSCT

Impact Factor: 7.301

Scientific Journal Impact Factor
www.sjifactor.com

ISSN No. : 2581-9429

A Double Blind Peer-Reviewed Refereed Monthly Journal



Volume 3, Issue 17, May 2023

doi Crossref

DOI: 10.48175/568

SCOPE DATABASE INDEXED

www.ijarsct.co.in

Volume 3, Issue 17, May 2023

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

## TABLE OF CONTENTS

चंदगड तालुक्यातील स्वातंर्त्य सैनिकांची व्यथा व वेदना 7–6

*प्रा. आप्पासाहेब धोंडीराम कांबळे*

'चले जाव' चळवळीतील सोलापूरचे योगदान 7–14

*डॉ. किशोर नागनाथ जोगदंड*

1942 च्या भारत छोडो आंदोलनात कोल्हापूर जिल्ह्यातील जनसमूहाचा सहभाग– एक दृष्टीक्षेप 15–21

*डॉ रमेश धनराज जाधव*

काशीबाई कानिटकर व लीलाताई पाटील यांचे भारतीय स्वातंर्त्य चळवळीतील योगदान 22–26

*प्रा. अरुण सदाशिव कटकोळे*

हिदुस्थानातील पहिली सर्कसः ग्रँड इंडियन सर्कस' 27–32

*प्रा. डॉ. चंद्रकांत शिवराम गिरी*

'भारतीय स्वातंत्र्य चळवळीमधील विजयी मराठा वर्तमानपत्राचे योगदान' 33–37

*डॉ. एस. ए. मोरे*

Volume 3, Issue 17, May 2023

"मलकापूर शहराचे आर्थिक जीवन" 38–47

*प्रा. डॉ. सोनावले राजेंद्र रघुनाथ*

1857 च्या उठावातील छत्रपती चिमासाहेब उर्फ शाहू महाराजांची भूमिका 48–52

*डॉ. संभाजी विश्वासराव माने*

आष्टा शहरातील स्वातंत्र्य चळवळ 53–69

*प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश*

पहिले स्वातंत्र्ययुध्द (1857) आणि राणी लक्ष्मीबाई 70–73

*सौ. देशमुख सुजाता सचिन*

ब्रिटिश सत्तेविरुद्धचा कोल्हापुरातील १८४४ चा गडकऱ्यांच्या उठाव 74–77

*डॉ. खंडेराव शिंदे*

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महाराष्ट्राचे योगदान :एक दृष्टीक्षेप 78–83

*डॉ. नितेश सुरवसे*

स्वातंत्र्य चळवळीतील महाराष्ट्राचा अनुबंध आणि देशव्यापी प्रभाव 84–91

*प्रा. डॉ. दिलीप तुकाराम कदम*

स्वातंत्र्य व सामाजिक चळवळीतील स्त्री योगदान–हौसाबाई पाटील यांचे कार्य 92–96

*डॉ. विश्वनाथ काशिनाथ सोनवणे*

क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान 97–103

*प्रा– सुशमा विलासराव जाधव*

स्वतंत्रता संग्राम और हिंदी कविता 104–108

*डॉ. सहदेव वर्षाराणी निवृत्तीराव*

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

IJARSCT
Impact Factor: 7.301

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Volume 3, Issue 17, May 2023

# "मलकापूर शहराचे आर्थिक जीवन"

प्रा. डॉ. सोनावले राजेंद्र रघुनाथ

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली) , ता. पलूस. जि. सांगली

rajendrasonawale26@gmail.com

**गोषवारा**

विशाळगड किल्ल्यामुळे मलकापूर भागात प्राचीन काळापासून ते आधुनिक काळात अनेक स्थित्यंतरे घडून आली. या भागाला ऐतिहासिक, धार्मिक आणि राजकीय बारसाही लाभलेला आहे. शिलाहार, यादव, बहामनी, मोघल, मराठे, इंग्रज अशा अनेक घराण्यांनी व राजसत्तांनी राज्य केले. या सर्व सत्तांचा अमंल या भागावर प्रस्थापित झाला होता. या सर्वांची सत्ता उलटवून टाकण्यात मराठयांना सहाय्य करण्यात परशुराम त्रिंबक प्रतिनिधी आणि त्यांच्या वंशजांनी महत्त्वाची भूमिका बजावली. विशाळगडचे जहागिरदार म्हणून प्रतिनिधींचे नाव पुढे नावारूपास आले. मलकापूर येथील प्रतिनिधींचा राजवाडा आजही वरील सर्व घटनेचा साक्षीदार आहे. संस्थानकालीन नगरपालिका आजही अस्तित्वात आहे. ही इतिहासातील अभूतपूर्व घटना आहे. मलकापूर हे ठिकाण कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावर असल्याने त्यास महत्त्व आहे. गूळाच्या बाजारपेठेसाठी मलकापूर प्रसिद्ध आहे. बांबू पासून तयार होणा-या वस्तूकरिता मलकापूरची वेगळी ओळख आहे. मलकापूरला ऐतिहासिक, आर्थिक, धार्मिक आणि पर्यटनांच्या दृष्टिकोनातून महत्त्व प्राप्त झाले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आर्थिक दुर्बलता होती. शेतमजूर, कारागीर, लहान शेतकरी आणि किरकोळ व्यापारी यांची आर्थिक परिस्थिती बिकट होती. अनेक कुटुंबे खाजगी सावकारीच्या विळख्यात गुरफटलेली होती. त्यांना कामातून मिळालेले पैसे हे कर्जाच्या व्याजावर खर्च होत. परंपरागत कृषी पद्धत, अज्ञान, अनियमित पाणी पुरवठा आणि शेतीमालाचे अनिश्चित भाव इ. समस्या शेतक-यांच्या होत्या. शेतकरी शेती कामासाठी आणि शेतीपूरक व्यवसायासाठी कर्ज काढत पण कर्जाची परतफेड करताना शेतक-यांना अडचणी येत असत. खाजगी सावकाराच्या भरमसाठ व्याजामुळे शेतक-यांची पिळवणूक होत असे. शेतक-यांचे दारिद्रय, मागासलेपणा दूर करून त्यांना आर्थिक मदतीची गरज होती. महाराष्ट्रात सहकार चळवळ सुरू झाल्यानंतर त्यांच्यात सुधारणा होवू लागली. नैसर्गिक अनुकूल हवामान, पाऊस, जमिनीची सुपीकता, मानवी कष्ट, सुधारित शेती अवजारे, जमिनीला होणारा कृत्रिम पाणी-पुरवठा आणि बी-बियाणे, मलकापूरची जमीन, शेती हंगाम, शेतकरी जीवन, जलसिंचन,कृषी उत्पादने, शेतीची मशागत, शेतीसाठी खतांचा वापर, मलकापूरातील उद्योगधंदे किंवा व्यवसाय, वाहतूक आणि दळणवळण, मलकापूरातील सहकारी बँका इत्यादी घटकांच्या आधारे मलकापूर गावच्या लोकांच्या आर्थिक जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना:-**

स्वातंत्र्यपूर्व काळात आर्थिक दुर्बलता होती. शेतमजूर, कारागीर, लहान शेतकरी आणि किरकोळ व्यापारी यांची आर्थिक परिस्थिती बिकट होती. अनेक कुटुंबे खाजगी सावकारीच्या विळख्यात गुरफटलेली होती. त्यांना कामातून मिळालेले पैसे हे कर्जाच्या व्याजावर खर्च होत. परंपरागत कृषी पद्धत, अज्ञान, अनियमित पाणी पुरवठा आणि शेतीमालाचे अनिश्चित भाव इ. समस्या शेतक-यांच्या होत्या. शेतकरी शेती कामासाठी आणि शेतीपूरक व्यवसायासाठी कर्ज काढत पण कर्जाची परतफेड करताना शेतक-यांना अडचणी येत असत. खाजगी सावकाराच्या

ISSN (Online) 2581-9429

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

IJARSCT

Impact Factor: 7.301

Volume 3, Issue 17, May 2023

भरमसाठ व्याजामुळे शेतक-यांची पिळवणूक होत असे. शेतक-यांचे दारिद्र्य, मागासलेपणा दूर करून त्यांना मदतीची गरज होती. महाराष्ट्रात सहकार चळवळ सुरू झाल्यानंतर त्यांच्यात सुधारणा होवू लागली. नैसर्गिक अनुकूल हवामान, पाऊस, जमिनीची सुपीकता, मानवी कष्ट, सुधारित शेती अवजारे, जमिनीला होणारा कृत्रिम पाणी-पुरवठा आणि बी-बियाणे इत्यादी घटकांवर पिकांची उत्पादन क्षमता अवलंबून असते.अशाप्रकारे मलकापूर गावच्या लोकांच्या आर्थिक जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**१) मलकापूरची जमीन :-**

कोल्हापूर जिल्हयात काळी, तांबडी, मळी व खारी अशा चार प्रकारची उत्तम, मध्यम आणि हलकी जमीन आढळते. विशेषतः मलकापूर भागात काळी, तांबडी आणि खारी स्वरूपाची जमीन आढळते. उत्तम प्रकारच्या जमिनीतून बागायती पिके घेतली जात. या जमिनीला वर्षभर पाणी पुरवठा केला जात. उत्तम प्रकारात काळी आणि तांबट जमिनीचा समावेश होतो. काळी जमीन नद्यांच्या खो-यांत आणि तांबडी जमीन सहयाद्रीजवळच्या डोंगर उतरणीवर व ओढयांच्या खो-यांत आढळते. तांबडया जमिनीत लोहाचे प्रमाण अधिक असते. अशी जमीन जिल्हयात पन्हाळा, भुदरगड पेटयात व विशाळगड आणि बावडा जहागिरीत मोठया प्रमाणात आढळते.[१]

**२) शेती हंगाम :-**

शेती व्यवसायात खरीप आणि रब्बी असे दोन हंगाम असतात. नैऋत्य मान्सून पावसावर जी पीके घेतली जातात त्यांना 'खरीप' पीके म्हणत आणि ईशान्य मान्सून पावसावर जी पीके घेतली जातात त्यांना 'रब्बी' हंगाम म्हणनात.[२] मलकापूरमधील शेतकरी खरीप हंगामासाठी नैऋत्य मान्सून पावसावर अवलंबून असत. रोहिणी नक्षत्रातील पावसाच्या सरीचा शेतीच्या मशागतीसाठी चांगला उपयोग होतो. या भागातील शेतकरी या हंगामात भात, नाचणी, वरी, सावा, राळा, खरीप ज्वारी, भुईमूग, कापूस आणि तंबाखू इत्यादी पिकांचे उत्पादन घेत असत. तसेच रब्बी हंगाम हा ऑक्टोबर महिन्यापासून सुरू होवून तो मार्चमध्ये संपतो. मलकापूरातील शेतकरी या हंगामात ईशान्य मान्सून पावसावर आधारित रब्बी ज्वारी किंवा शाळू, हरभरा आणि गहू इत्यादी पीकांचे उत्पादन मोठया प्रमाणात घेतात.

**३) शेतकरी जीवन :-**

मलकापूरच्या लोकांचा उदरनिर्वाह हा शेतीवर आधारित आहे. जिल्हयातील शेतकरी अतिशय कष्टाळू व प्रयोगशील असलेला दिसतो. शेती सुधारणा करून जास्त उत्पन्न घेण्याकडे त्यांचा कल दिसतो. शेती काम करणा-यांशेतक-यांना कुणबी म्हणत. शेतकरी मध्यम उंचीचे, सुदृढ बांध्याचे आणि भात, भाकरी व मसालेदार भाजी खाणारे आहेत. स्त्रिया घरकाम सांभाळून पुरूषाच्या बरोबरीने शेतात काम करतात. कुणब्याशिवाय शेती काम करण्यामध्ये लिंगायत, जैन, ब्राह्मण, मराठा, मुसलमान, बेरड, धनगर, कोळी, महार व कारागीर इत्यादी जातीचा समावेश होतो. कुणबी शेतकरी मेहनती व जुन्या चालीरिती न सोडणारे आहेत. जैन आणि लिंगायत शेतकरी कष्टाळू आहेत. ब्राह्मण व मराठा शेतकरी शेतात स्वतः काम न करता गडी लावून शेती करत. कुणब्यापेक्षा मुसलमान शेतकरी कष्ट कमी करत असत. शेती कमी किफायतशीर असल्यामुळे बेरड, धनगर, कोळी आणि महार इत्यादी शेतकरी व कारागीर लोक आपला व्यवसाय सांभाळून शेती करीत.[३]

४) जलसिंचन :-

पूर्वी कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व शेती पावसावर अवलंबून होती. शेतीला कृत्रिम पाणी पुरवठयाची सोय केल्यावर उत्पादनात वाढ होईल हे शासनाच्या, शाहू महाराजांच्या आणि शेतक-यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनीशेतीला कृत्रिम पाणी पुरवठा करण्यासंदर्भात महत्वाची भूमिका बजावली. त्यासाठी नद्यावर धरणे, तळी, विहिरी आणि प्रकल्प बांधून पाणी साठयाचा उपयोग शेती कामासाठी केला.

१) कालवे :-

कोल्हापूर भागात राजर्षी शाहू महाराजांनी 'राधानगरी' धरण बांधल्यानंतरच या भागात कालवे झाले. विशेषतः कासारी, कडवी आणि जांभळी मध्यम प्रकल्पांने शाहूवाडी तालुक्यातील बरीचशी जमीन बागायताखाली आली. जिल्ह्यात कालव्याद्वारे जलसिंचनाखाली विशेष क्षेत्र नाही. परंतु नद्यावर कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधून उपसा जलसिंचनाद्वारे जास्त क्षेत्र ओलिताखाली आणले आहे.

२) धरणे व पाट :-

पावसाळयात नदी व ओढयांना भरपूर पाणी असते. या नदी नाल्यावरती तात्पुरते बांध घालून शेतीला पाणी पुरवठा केला जातो. मलकापूरच्या डोंगराळ भागात बांध व पाट हे मातीने घालत असत. नद्या-ओढयांच्या पाण्याला उतार असल्याने हे पाट जानेवारी-फेब्रुवारी दरम्यान कोरडे पडत असत.

३) विहिरी :-

मलकापूर भागात जी बागायती शेती केली जात होती ती विहिरीच्या पाण्यावर आधारित केली जात होती. पूर्वी विहिरीतील पाणी मोटेच्या सहाय्याने काढून शेतीला दिले जात होते. या भागात विहिरीचे प्रमाण ब-यापैकी आहे. पाऊस-पाणी चांगला झाला तर विहिरीला पाणी असते. कोल्हापूर जिल्ह्यात सन १८९३ मध्ये विहिरींची संख्या १२०१६ इतकी होती. पाट बांधण्यासाठी आणि विहिरी खोदण्यासाठी सरकारकडून शेतक-यांना आर्थिकमदत केली होती. शेतीत विहिरीच्या पाण्यावर नगदी पिके आणि भाजीपालाही घेतला जात असे. आडवलेले पाणी इंजिन आणि इलेक्ट्रिक मोटरीच्या सहाय्याने शेतीसाठी वापरण्यात येवू लागले. परंतु उंचावर असलेल्या भागावर पाण्याची सुविधा नसल्यामुळे त्याठिकाणी उत्पादनाचे प्रमाण फार कमी असल्याचे आढळते. नारायण केरबा पाटील यांच्या मुलाखतीतून अशी माहिती मिळाली की नदीवरील धरणे, बंधारे आणि तलावाच्या पाणी साठयाचा शेती कामासाठी चांगला उपयोग झाला. शेतीतून मिळणा-या ऊस व भात उत्पादनात वाढ झाली. त्यामुळे आमची आर्थिक परिस्थिती सुधारत आहे. असे त्यांनी सांगितले.[४]

५) कृषी उत्पादने :-

मलकापूरातील बहुतांशी लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे.मानवी कष्ट व शेतीची मशागत करण्यासाठी वापरली जाणारी अवजारे हे धान्य उत्पादनातील महत्त्वाचे घटक आहेत. कृषी उत्पादने खरीप व रब्बी अशा दोन हंगामात घेतली जातात. तृणधान्यामध्ये गहू, ज्वारी, मका, राळे, वरी, भात, ही पीके घेतली जात. कडधान्यामध्ये हरभरा, हुलगा, मूग, उडीद, चवळी आणि मटकी ही कडधान्ये घेत. तेलबियामध्ये जवस, करडई,


Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in
ISSN 2581-9429 IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Volume 3, Issue 17, May 2023

IJARSCT
Impact Factor: 7.301

भुईमूग, तीळ, कारळे इत्यादी आणि बागायती पीकात ऊस, तंबाखू, कापूस तसेच आंबा, नारळ, केळी, पेरू इत्यादी पीके शेतकरी घेत असतात.

**१) भात :-**

मलकापूरच्या डोंगराळ भागात भात पीक मोठया प्रमाणात घेतात. सोयीनुसार पाभारीच्या सहाय्याने, टोकण पद्धतीने किंवा लावणी पद्धतीने भाताची पेरणी शाहूवाडी, पन्हाळा, बावडा, राधानगरी, भुदरगड आणि आजरा तालुक्यातील शेतकरी करतात. लावणी पद्धतीत प्रथम रोपे तयार करण्यात येतात. त्यासाठी योग्य जमिनीचा तुकडा निवडून तो तुकडा मार्च-एप्रिल महिन्यात नांगरून ढेकळे फोडून भुसभूशीत करून गादीवाफे तयार करतात. पाऊस पडल्यानंतर वाफ्यांमध्ये बी पेरून साधारणत:२०-२५ दिवसानंतर रोपास सहावे पान फुटल्यावर ती रोपे काढून त्यांची पिकासाठी तयार केलेल्या जमिनीत लावणी करतात. या भागात अनेक प्रकारचा भात पिकवला जातो. उदा. मुगद, शिरेसाळ, करणेमाळ, आंबेमोहोर, सोमसाळ, बायंगणी, पडवळ, बरगळ, रावळी, तामसाळ, जिरगे इत्यादी.[५]

**२) नाचणी :-**

जिल्हयात तृणधान्य पिकांमध्ये नाचणीहे पीक प्रामुख्याने जिल्हयातील आजरा, भुदरगड, चंदगड, गडहिंग्लज, राधानगरी व शाहूवाडी मलकापूर या ठिकाणच्या डोंगराळ व जास्त पावसाच्या भागात हलक्या प्रतीच्या जमिनीत घेतात. नाचणीचे हे पीक मुख्यत: पावसावर अवलंबून असते. नाचणीची रोपे टणक असल्यामुळे हलक्या प्रतीच्या जमिनीत चांगली वाढतात. हे पीक नोव्हेंबर महिन्यात तयार होते. जिल्हयाच्या पश्चिम भागातील गरीब लोकांचे नाचणी हे प्रमुख अन्न आहे. नाचणीचा तृणधान्य पीकांमध्ये जरी तिसरा क्रमांक असला तरी सध्या या पिकासाठी उपयुक्त असलेल्या जमिनीत संकरित ज्वारीची लागवड मोठया प्रमाणात करण्यात येत असल्यामुळे नाचणी खालील क्षेत्रात सारखी घट होत आहे.[६]

**३) गहू :-**

भात, ज्वारी आणि नाचणीच्या पिकानंतर गव्हाचा क्रमांक लागतो. या पिकाखालील क्षेत्र शाहूवाडी, मलकापूर, हातकणंगले व शिरोळ या भागात जास्त आहे. प्रामुख्याने गव्हाचे पीक हे रब्बी हंगामात जलसिंचन करून घेतात. खपली नामक जातीची लागवड लोकप्रिय आहे. गव्हाची पेरणी ही ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये केली जाते आणि कापणी व मळणी फेब्रुवारी-मार्च महिन्यात केली जाते. जिल्हयातील हवामान व जमिनीचा गुणधर्म यानुसार जिल्हयासाठी शासनाच्या कृषी विभागाने निफाड-४, केनफाड-४ या जातींची शिफारस केली आहे. सध्या अधिक उत्पादन देणा-या जातींच्या प्रसारामुळे गव्हाच्या लागवडीत सारखी वाढ होत आहे.[७]

**४) मका:-**

मलकापूर भागात मक्याचे पीक हे ऊस व हळदीच्या पिकात मिश्रपीक म्हणून शेतकरी घेत असतात. हे पीक जरी बारमाही असले तरी ते प्रामुख्याने रब्बी हंगामात जास्त घेतले जाते. पूर्वी १९५९ सालामध्ये मलकापूर व शाहूवाडी या भागात शेतीतील मक्याच्या पिकांवर हुमणी रोगाचा प्रादुर्भाव झाला होता. या रोगामुळे मक्याचे सारे पीक वाया जाण्याच्या मार्गावर होते. त्यामुळे येथील शेतकरी हवालदिल झाला होता. त्यावेळी मलकापूर

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.301
Volume 3, Issue 17, May 2023

नगरपालिकेच्या कर्मचा-यांनी शेतक-यांना या रोगासंदर्भात विविध औषधांचे व फवारणीचे मार्गदर्शन केले होते.[८] सध्या या भागात संकरीत मक्याचीही लागवड सुरू झालेली आहे.

### ५) ऊस :-

कोल्हापूर जिल्हयातील सर्वात महत्त्वाचे नगदी पीक ऊस आहे. जिल्हयाची अर्थव्यवस्था ऊस या पीकावर आधारित आहे. येथील हवामान व जमीन ऊसाच्या लागवडीसाठी अतिशय पोषक असल्याने या पिकाची लागवड मोठया प्रमाणात केली जाते. लागवडीखालील ऊसाचे क्षेत्र आणि उत्पादनाच्या दृष्टीने राज्यात जिल्हयाचा अग्रक्रम लागतो. येथील ऊसाचे वैशिष्टये म्हणजे ऊसापासून तयार होणारा गूळ देशभर प्रसिद्ध आहे. तसेच ऊस साखरेच्या उता-याच्या दृष्टीनेही प्रसिद्ध आहे. त्यामुळे सन १९८५ मध्ये जिल्हयात एकूण ११ साखर कारखाने अस्तित्वात होते. ऊसाची लागवड ही आडसाली, पूर्वहंगामी आणि सुरू या तीन हंगामात केली जाते.[९] ऊसाच्या पिकास भरपूर पाण्याची आवश्यकता लागते. मलकापूर भागातील वाढत्या जलसिंचनाच्या सोयीमुळे ऊस पिकाखालील क्षेत्रात दिवसेंदिवस वाढ होत आहे.

### ६) कॉफी व बटाटा :-

कॉफी लागवडीचा प्रयोग पन्हाळा-भुदरगड, विशाळगड आणि बावडा येथे करण्यात आला होता. या पिकाचे उत्पादन डोंगर उतारावरील जमिनीत शेतकरी घेतात. पन्हाळा तालुक्यातील तीन दरवाजा बाग आणि भुदरगड या ठिकाणी वेलदोडे लागवडीचा प्रयोग झाला होता. पन्हाळा आणि मलकापूर या भागात शेतकरी मोठया प्रमाणात बटाटयाचे उत्पादन घेतात. शेतक-यांना या पिकापासून चांगला मोबदला मिळतो.

### ६) शेतीची मशागत :-

पेरण्यासाठी तिफण, विळा, कु-हाड, कुदळ, खो-या, टोपली आणि बैलगाडी इत्यादी साहित्याचा शेतकरी शेती कामासाठी उपयोग करत असत. पूर्वी शेतकरी शेती नांगरण्यासाठी बैले, रेडे यांचा वापर करीत असत. सध्या मात्र तंत्रज्ञानात प्रगती झाल्याने शेती मशागतीसाठी ट्रॅक्टरचा वापर केला जात आहे. पहिल्यांदाजमीन नांगरली जात असे.त्यानंतरकुळवणीने जमीन पूर्ण सपाट केली जात. जमिनीतील वाळलेले गवत वेचून काढत आणि पेरणीसाठी जमीन तयार ठेवत. हाताच्या सहाय्याने बी जमिनीत टोचले जात किंवा कुरीच्या सहाय्याने रेषा आखून बी टोकले जात असत. तिफणीच्या सहाय्याने पेरणी केली जात असे. पेरणी केल्यानंतर फक्त लाकडी दिंड शेतातून फिरविले जात. पिकातील गवत काढण्यासाठी कोळप्याचा वापर करीत. ज्वारी, नाचणी, भात, ऊस, तंबाखू, कापूस, भाजीपाला इत्यादी पिकांची अंतर्गत मशागत वेगवेगळया पद्धतीने केली जाते.

### ७) शेतीसाठी खतांचा वापर :-

मलकापूरातील शेतकरी शेती उत्पादनात वाढ होण्यासाठी सेंद्रिय खतांचा वापर करत. जिरायत व बागायत जमिनीत कमी-अधिक प्रमाणात खत टाकत. पूर्वी या परिसरात जनावरांच्या शेणखताचा व मुतारीचा खत म्हणून जास्त प्रमानात वापर करीत. त्यावेळी रासायनिक खते वापरली जात नव्हती. सध्या मात्र या खताचा वापर होतांना दिसत आहे. भाताच्या शेतीसाठी नेहमी शेणखत घालत असत. जिरायत जमिनीत शेतक-याला वाटेल त्यावेळीच खत घातले जात असे. नदी काठच्या मळी जमिनीत कधीच खत घातले जात नसे. काळया व

ISSN (Online) 2581-9429

IJARSCT

IJARSCT
Impact Factor: 7.301

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Volume 3, Issue 17, May 2023

उत्तम प्रतीच्या तांबडया जमिनीस तीन वर्षातून एकदा खत दिले जाते. लाल व हलक्या तांबडया जमिनीला दोन वर्षातून एकदा खत दिले जाते. सेंद्रिय खतांमध्ये जनावरांचे शेणखत, शेळया-मेंढयाचे लेंढीखत, राब आणि हिरवळीचे खत इत्यादी खतांचा वापर करत. सोनखत हे तंबाखू या नगदी पिकासाठी वापरत. शेळया-मेंढया शेतात बसविल्यामुळे लेंढया व मूत्र शेतात पडत. हे एक उत्तम प्रकारचे खत आहे. त्याचबरोबर शेतकरी हिरवळी खत तयार करण्यासाठी ताग व तीळ शेतात पेरून वाढवत आणि फुले आले की जमिनीत गाडत असत. अशा प्रकारच्या खताचा वापर कमी-जास्त प्रमाणात केला जाई. बागायत शेतीला खताचा वापर करीत. मात्र जिरायत शेतीत शेतक-यांना वाटल्यास खत वापरत असत.

**८) मलकापूरातील उद्योगधंदे किंवा व्यवसाय :-**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आर्थिक जीवनात व्यापार व उद्योगधंदे यांना महत्त्व आहे. देशाची आर्थिक समृद्धी आणि भरभराट ही शेतीवर अवलंबून आहे. स्वावलंबन हे ग्रामीण व्यवसायाचे ध्येय होते. ग्रामीण भागात लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. शेती व्यवसायावरच शहरी व्यवसाय अवलंबून आहेत. पूर्वी खेडी ही स्वयंपूर्ण मानली जात होती. कारण गावातील लोकांच्या गरजा गावातच भागविल्या जात होत्या. मलकापूर शहरात लहान स्वरूपात व्यवसाय आढळून येतात. कोल्हापूर रत्नागिरी महामार्गावर मलकापूर शहरआहे. मलकापूरच्या सभोवती डोंगराळ भाग आहे. मलकापूर येथे शुक्रवार या दिवशी आठवडी बाजार भरतो. याठिकाणी आसपासच्या खेडयातून लोक बाजार करण्यासाठी येतात. तसेच लहान मोठे व्यापारीही येथे येतात. येथील लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे.

**१) हातमाग उद्योग :-**

हातमाग उद्योगासाठी इचलकरंजी प्रसिद्ध आहे. दुस-या महायुद्धपूर्व काळात इचलकरंजीत उत्तम कलाकुसरीच्या नवनवीन त-हेच्या पातळांचे किंवा साडयांचे उत्पादन घेतले जात होते. त्यामुळे इचलकरंजी शहराला 'महाराष्ट्राचे मॅचेस्टर' असे म्हणतात. सन १८४५मध्ये हातकणंगले तालुक्यात६३६ हातमाग होते. त्यापैकी २३६ हातमाग एकटया इचलकरंजीत होते. हा व्यवसाय मुख्यत्वेकरून साळी, कोष्टी, जिनगर व मुसलमान हे लोक करीत असत. खादी, धोतर, पंचा, रेशमी व बिगररेशमी घडीची लुगडी आणि रूमाल इत्यादी प्रकारचे उत्पादन करीत असत.१९व्या शतकाच्या उत्तरार्धात कोल्हापूर संस्थानात एकूण ३१०२ हातमाग होते. हा उद्योग गडहिंग्लज, करवीर, शिरोळ, भुदरगड, बावडा, पन्हाळा, कागल, इचलकरंजी आणि विशाळगड, मलकापूर येथे सुरू होता.[१०]

**२) गूळ उद्योग :-**

कोल्हापूर परिसरात गूळ तयार करणे हा फार जुना उद्योग आहे. ऊसापासून रस काढून मोठया काहीलीत उकळवून गूळ तयार केला जातो. सन १८४५ पासून गूळाची निर्यात या भागातून कच्छ, काठेवाड आणि गुजरातमधील इतर भागात केली जात असे. कोल्हापूरच्या पश्चिमेकडे अनुस्कुरा घाटातून गूळ रायगड जिल्हयातील नागोठाणे बंदरात जात असे तेथून त्याची जलमार्गाने निर्यात होत असे. पन्हाळा पेठयात व आजरा भागात गूळ बनविण्याचा व्यवसाय मोठया प्रमाणात आढळतो. याबरोबर मलकापूर परिसरातही तीन गूळ तयार करणारे ऊसाचे घाणे आहेत. तेथील तयार होणारा गूळ हा कोकण भागात विक्रीसाठी पाठविला जातो. मलकापूर



Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in

ISSN 2581-9429 IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Volume 3, Issue 17, May 2023

येथील गूळाची बाजारपेठ प्रसिद्ध आहे. सुरेश विकास घोरपडे यांनी सांगितले की, गूळाच्या उत्पादनातून शेतक-यांना चांगला फायदा होतो. मजूरांनाही रोजगार उपलब्ध झाल्यामुळेत्यावरती त्यांचा उदरनिर्वाह चालत आहे.११

गूळाच्या व्यापाराला उत्तेजन देण्यासाठी शाहू महाराजांनी सन १९०५ मध्ये कोल्हापूरात 'शाहुपूरी' बाजारपेठेची स्थापना केली. गु-हाळ, घाणे मोठया शेतक-यांच्या मालकीची होती. जाळवी, गुळवी, तोडकर हे कामगार या व्यवसायात काम करत. हे लोक गूळाशिवाय 'काकवी' हा पदार्थही तयार करत. एकंदरीतजिल्हयातील हवा, पाणी आणि जमीन ऊसाच्या पिकाला अगदी योग्य असल्यामुळे येथे चवदार व टिकाऊ गूळ तयार होतो. त्यामुळे कोल्हापूरी गूळ संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे.१२

**३) सराफ उद्योग :-**

मलकापूर या ठिकाणी सोन्या-चांदीचे दागदागिने तयार करणारी लहान मोठी दुकाने आहेत. खेडयातील लोक दागिने तयार करण्यासाठी येथे येतात. याठिकाणी सोन्या-चांदीची नऊ दुकाने आहेत. येथे सोन्या चांदीचे दागिने तयार करतात. मलकापूरातील हा एक चांगला उद्योग आहे. कोल्हापूर जिल्हयातील 'कोल्हापूरी साज'हा दागिना महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. सन १९०४ मध्ये हुपरी येथे कृष्णाजी रामचंद्र पोतदार यांनी पहिला 'चांदी कारखाना' सुरू केला. शाहू महाराजांच्या पसंतीला उतरतील असे हत्ती, घोडयांचे अलंकार या कारखान्याने बनविले त्यामुळे पोतदारांना दरबाराचे काम मिळाले आणि हुपरीत चांदीचा व्यवसाय स्थिरावला. 'हुपरी' हे गाव चांदीच्या कलाकुसरीच्या कामासाठी भारतात प्रसिद्ध आहे. या व्यवसायात सोनारा व्यतिरिक्त मराठा, ब्राह्मण, जैन आणि मुसलमान इत्यादी समाजातील कारागीरही काम करतात. हे कारागीर सोन्या चांदीच्या दुकानदारांच्या मागणीप्रमाणे दागिने तयार करून देतात. उदा. कोल्हापूरी साज, बोरमाळ, नेकलेस, बांगडया, गोफ, अंगठया, भांडी, पायातील जोडवी आणि देवादिकांच्या मूर्ती इत्यादीचे उत्पादन घेतले जाते.१३

**४) कुंभार उद्योग :-**

कुंभार समाजातील लोक प्रामुख्याने मातीची भांडी, विटा आणि कौले तयार करण्याच्या कामात गुंतलेले आहेत. शहरातील मक्तेदार कारागीरांना विटा व कौले तयार करण्याकरिता रोजंदारीवर ठेवत.मातीची भांडी तयार करण्यासाठी लाकडी चाकाचा उपयोग केला जातो. सध्या विजेवर चालणारे 'शैला' नावाच्या नविन सुधारित चाकाचा वापर करत. या समाजातील लोक ग्रामीण भागातील काही कुंभार अजूनही परंपरागत बलुतेदार पद्धतीने व्यवसाय करतात. विटा, कौले व मातीची भांडी बनविण्याचा उदयोग कोल्हापूर, हलकर्णी, जयसिंगपूर, वडगाव, हुपरी, कोडोली, मलकापूर, राशिवडे इत्यादी ठिकाणी हा व्यवसाय मोठया प्रमाणात चालतो.१४

**५) बुरूड उद्योग :-**

मलकापूर या ठिकाणी बांबूपासून वेगवेगळया प्रकारच्या वस्तू बनविण्याचा उद्योग प्रामुख्याने 'बुरूड आणि कोरवी' या जमाती करतात. बांबुपासून सूप, दूरडी, तट्टे, पाटया, शिबरी आणि ईरली अशा अनेक वस्तू यापासून तयार करतात. विशेषता 'कोरवी' जमातीचे लोक धान्याचा साठा करण्यासाठी शेतक-यांना लागणा-या 'कणग्या' तयार करतात. तसेच बुरूड हे लोक घरगुती उपयोगासाठी लागणा-या वस्तू तयार करत. बांबूपासून तयार होणा-या वस्तूसाठी मलकापूर बाजारपेठ प्रसिद्ध आहे. या भागात भरपूर पाऊस असल्याने पावसापासून

ISSN (Online) 2581-9429
IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Volume 3, Issue 17, May 2023
IJARSCT
Impact Factor: 7.301

बचाव करण्यासाठी येथील लोक 'ईरले'चा वापर शेतीकामासाठी सर्रास करतात. त्यामुळे ईरल्याचे उत्पादन जास्त प्रमाणात घेतले जाते. या उदयोगातून 'बुरूड व कोरवी' जमातीचा आर्थिक फायदा होत आहे.

**६) चर्मोद्योग :-**

मलकापूर या ठिकाणी चांभार आणि ढोर लोक हा व्यवसाय करत. जनावरांच्या कातडीपासून वस्तू तयार करत. याचा समावेश चर्मोद्योगात होतो. चामडयापासून कातडी वस्तू तयार करण्यासाठी कातडयावर विविध प्रक्रिया करावी लागते त्यास कातडी कमावणे असे म्हणतात. हा उद्योग ढोर लोक करीत असत.कमावलेल्या कातडया पासून चांभार लोक चपला, जोडे, मोट (विहिरीतून पाणी काढण्यासाठी) पखाल (पाणी वाहून नेण्याची कातडी पिशवी) आणि लगाम तयार करतात.[१५]

**९) वाहतूक आणि दळणवळण :-**

आर्थिक विकासावर वाहतूक व दळणवळण साधनाचा फार मोठा परिणाम होतो. लोकांच्या दैनंदिन गरजा आणि आर्थिक गरजांची पूर्तता ही या साधनामुळे पूर्ण होते. आर्थिक विकासातील समतोलपणा साधण्यासाठी दळणवळणाचा उपयोग होतो. पूर्वी सन १९४४पर्यंत वाहतूक व दळणवळणासाठी बैलगाडया, टांगे, घोडे या साधनाचा वापर करत.१९व्या शतका अखेरीस जिल्हयात अनेक नव-नवीन रस्ते होण्यास सुरूवात झाली. पुढे २० व्या शतकात वाहतुकीमध्ये रेल्वे, ट्रक, टेम्पो, चार चाकी आणि दोन चाकी इत्यादी सर्व वाहनांचा वापर करु लागले . दळणवळणामध्ये घाट, रस्ते, जलमार्ग, लोहमार्ग, पूल, पोस्ट व तार ऑफिस इत्यादींचा वापर केला जातो.

**१) रस्ते :-**

कोल्हापूरातून कोकण समुद्रकिना-यापर्यंत जाण्यासाठी आंबा, फोंडा आणि आंबोली घाटात मोठे रस्ते बांधले आहेत. आंबा घाटाचा रस्ता रत्नागिरीला जातो. हा रस्ता कोल्हापूरातून पंचगंगा नदीवरून नावली, आवळी, बांबवडे आणि मलकापूर मार्गे आंबा गावास जातो. आंबा या गावाच्या नावावरून रस्त्याला 'आंबा घाट' असे नाव पडले.

**२) घाट :-**

वाहतूक दळणवळणासाठी घाटांना ऐतिहासिक महत्त्व आहे. हे घाट डोंगर रांगाच्या व भूपृष्ठांच्या विभाजनामुळे झाले आहेत. डोंगररांगेचा माथा व त्याच्या पलिकडील भू-भागाला घाटमाथा असे म्हणतात. कोल्हापूर जिल्हयाच्या व्यापार व वाहतूकीसाठी आंबा, फोंडा आणि आंबोली हे तीन घाट महत्त्वाचे आहेत. त्यामध्ये विशेपतः मलकापूर संदर्भातील आंबा घाटाचा उल्लेखकरताऐईल. आंबा घाटातून रत्नागिरी-कोल्हापूर-मिरज-विजापूर हा राज्य महामार्ग जातो. कोल्हापूर-रत्नागिरी वाहतूक या घाट मार्गेच होते. आंबा घाटमाथा कोल्हापूर जिल्हयातील शाहूवाडी तालुक्यात असून कोल्हापूरच्या वायव्येस ६० कि.मी. अंतरावर आहे. आंबा घाटमाथ्याच्या दक्षिणेस २०कि.मी.अंतरावर प्रसिद्ध विशाळगड किल्ला आहे. देवडा आणि प्रभानवल्ली घाटांच्या सुमारे१८ कि.मी.दक्षिणेस आणि कोल्हापूरच्या वायव्येस सुमारे ४८ कि.मी. अंतरावर 'अणुस्कुरा घाट' आहे. रत्नागिरी जिल्हयातील राजापूरहून येणारा शाहूवाडी तालुक्यातील सद्याच्या राजापूर-मलकापूर मार्ग याच घाटातून जातो.[१६]

३) पूल :-

वाहतुकीसाठी 'शाळी' नदीवर मलकापूरजवळ ३0 फूट रूंदीचा ५ कमानी असलेला दगडी पूल बांधण्यात आला आहे. या पुलाच्या बांधकामासाठी ३८०५०/- रूपये एवढा खर्च आला. तसेच मलकापूर शहराच्या पश्चिम बाजूस गाडेगौडाजवळ कडवी नदीवर पूल बांधला आहे. हा पूल पूर्णतः दगडात असून ३०फूटाच्या ५कमानी आहेत. या पूलाच्या बांधकामासाठी ३५४००/- रूपये खर्च आला. सन १८८२ साली या पूलाचे काम पूर्ण झाले.[१७]

१०) मलकापूरातील सहकारी बँका :-

सन १९३८ मध्ये 'कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक' स्थापन करण्यात आली.[१८]हि बँक स्थापन झाल्यानंतर सहकारी चळवळीची वाढ झपाट्याने झाली. याचा परिणाम मलकापूर मध्येही झाला. यातूनच पुढे मलकापूरमध्ये वेगवेगळे उद्देश ठेवून अनेक बँका स्थापन केल्या. यामध्ये कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पलूस सहकारी बँक, आजरा सहकारी बँक, वसंतराव चौगुले सहकारी बँक, राजर्षी शाहू सहकारी बँक, लोकमान्य नागरी सहकारी बँक, आजरा व्यापारी सहकारी बँक, जयवंतराव काटकर सहकारी बँक, मलकापूर अर्बन बँक, इचलकरंजी अर्बन बँक, बी.वाय.पाटील सहकारी बँक, सह्याद्री नागरी सहकारी बँक आणि श्री वीरशिव सहकारी बँक इत्यादी बँका मलकापूरच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. तसेच मलकापूर येथे जिल्हा प्राथमिक सहकारी बँकेची शाखा सुरू झाली. सहकारी संस्थांचे उपनिबंधक श्री.बी.वी.शेळके यांचे हस्ते उद्घाटन झाले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री.शिवाजीराव पाटील हे होते.[१९]या बँकांच्या माध्यमातून शेतक-यांना बी-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके इत्यादी कारणाकरीता प्राथमिक बँकामार्फत अल्प मुदतीची कर्जे दिली जातात. त्याशिवाय ह्या बँका शेतक-यांना गाई, म्हैशी, बैल, बैलगाडी, इंजिन, मोटर आणि पाईप लाईन्स इत्यादीच्या खरेदीसाठी व विहीर खोदण्यासाठी आणि दुरूस्तीसाठी साधारता३ ते ५ वर्षे मध्यम मुदतीची कर्जे देत असतात.

११) समारोप :-

विशाळगड किल्ल्यामुळे मलकापूरभागात प्राचीन काळापासून ते आधुनिक काळात अनेक स्थित्यंतरे घडून आली. या भागाला ऐतिहासिक, धार्मिक आणि राजकीय वारसाही लाभलेला आहे. शिलाहार, यादव, बहामनी, मोघल, मराठे, इंग्रज अशा अनेक घराण्यांनी व राजसत्तांनी राज्य केले. या सर्व सत्तांचा अमंल या भागावर प्रस्थापित झाला होता. या सर्वांची सत्ता उलटवून टाकण्यात मराठयांना सहाय्य करण्यात परशुराम त्रिंबक प्रतिनिधी आणि त्यांच्या वंशजांनी महत्त्वाची भूमिका बजावली. विशाळगडचे जहागिरदार म्हणून प्रतिनिधींचे नाव पुढे नावारूपास आले. मलकापूर येथील प्रतिनिधींचा राजवाडा आजही वरील सर्व घटनेचा साक्षीदार आहे. संस्थानकालीन नगरपालिका आजही अस्तित्वात आहे. ही इतिहासातील अभूतपूर्व घटना आहे. मलकापूर हे ठिकाण कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावर असल्याने त्यास महत्त्व आहे. गूळाच्या बाजारपेठेसाठी मलकापूर प्रसिद्ध आहे. बांबू पासून तयार होणा-या वस्तूकरिता मलकापूरची वेगळी ओळख आहे. अशाप्रकारे मलकापूरला ऐतिहासिक, आर्थिक, धार्मिक आणि पर्यटनांच्या दृष्टिकोनातून महत्त्व प्राप्त झाले आहे.

संदर्भ :-

१)चौधरी कि.का.,कोल्हापूर जिल्हागॅझेटियर,दर्शनिका विभाग ,महाराष्ट्र शासन मुंबई,१९८९ पृ. १९३

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
IJARSCT
Impact Factor: 7.301
Volume 3, Issue 17, May 2023

२)कित्ता,पृ.१९४
३)मोडकबालाजी प्रभाकर ,उपरोक्त,पृ.१८
४) मुलाकत-नारायण केरबा पाटील ,दि.२८ ऑगस्ट २०१६
५)मोडकबालाजी प्रभाकर ,उपरोक्त,पृ.१९
६) चौधरी कि.का., उपरोक्त,पृ.२०२
७) कित्ता,पृ.२०३
८)दैनिक पुढारी,कोल्हापूर,दि.६ नोव्हेंबर१९५९,पृ.९
९) चौधरी कि.का., उपरोक्त,पृ.२०४
१०) कित्ता,पृ.२८८
११) मुलाकत-सुरेश विकास घोरपडे ,दि.२० मे २०१६
१२) चौधरी कि.का., उपरोक्त,पृ.२७७
१३) कित्ता,पृ.२९५
१४) कित्ता,पृ.२९३
१५)शिंदे(डॉ.)खंडेराव, उपरोक्त,पृ.१६४,१६५
१६) चौधरी कि.का., उपरोक्त,पृ.४२०
१७) शिंदे(डॉ.)खंडेराव, उपरोक्त,पृ.१८८,१८९
१८) चौधरी कि.का., उपरोक्त,पृ.३५२
१९) दैनिक पुढारी,कोल्हापूर,दि.५ नोव्हेंबर१८८५